**Research Directions**
**Volume 1 , Issue 1 / July 2013** ISSN:-2321-5488

**Research Article**

# *संत साहित्यातील जनाबाईची अभंगवाणी एक अभ्यास*

एल . पी . तांबे .
सावित्रीबाई फुले महिला महाविदयालय ,
सातारा

***सारांश***

महाराष्ट्राच्या सांस्कृतिक आणि धार्मिक जीवनाला चालना देणारी शक्ती म्हणजे संतसाहित्य होय. संत साहित्य ही मराठी संस्कृतीची चिरस्थायी संपत्ती आहे. ही भूमी जशी शुरवीरांची आहे. तशी ती साधुसंतांची आहे. महाराष्ट्रामध्ये 13 व्या शतकाच्या सुमारास आध्यात्माच्या क्षेत्रात लोकशाही उदयाला येऊन आध्यात्मिक विकास झाला. अठरा–पगड जातीतील संतमंडळी आपला स्वानुभव अभंगवाणीतून प्रगट करु लागले. त्यामुळे त्यांची कविता अधिक संपन्न झाली.

***प्रस्तावना :–***

चंद्रभागेच्या तीरावर हरीनाम, भजन, कीर्तनात दंग झाली. परंतू काही संत मंडळीना इतरांप्रमाणे विठ्ठलाच्या मंदिरात जाऊन देवाचे दर्शन घेता येत नव्हते. डोळेभरुन पांडुरंगाला पाहावे, आलिंगन द्यावे, विठ्ठलाच्या पायावर मस्तक ठेवून परमसुखाचा आनंद घ्यावा, देवाशी सुसंवाद साधावा, अशी त्यांची मनापासून इच्छा होती. तरीही त्यांनी विवेकाचा उंबरठा ओलांडला नाही की क्रांतीची झेंडा हाती घेतला नाही. उलट अन्याय सहन करुन महाद्वाराच्या पायरीशीच ती एकरुप झाली. त्यामुळे त्यांच्या अभंगवाणीतून अन्याय चीड, दुःख, यातना, आर्तता, असाहाय्यता, व्यथा, वेदना आणि आक्रोश ऐकू आल्याशिवाय राहात नाही. याचा प्रत्यय जनाबाई, मुक्ताबाई, सायेराबाई, निर्मला, कान्होपात्रा, बहिणाबाई, वेणाबाई, चोखामेळा, गोरा कुंभार, सावंतामाळी इ. संतमंडळींच्या अभंगवाणीतून येतो.

जनाबाई ही वारकरी संप्रदयातील ज्ञानेश्वर–नामदेव समकालीन संत कवयित्री, नामदेवाची दासी आणि संत वाटिकेतील जाईची वेल म्हणून सुपरिचित आहे. जनाबाईंचे व्यक्तिमत्व मोठे आगळेवेगळे आहे. महिपती ताराबादकर यांनी ' संतचरित्रविषयक ' या लेखातून जनाबाईंच्या जन्मकाला विषयीची माहिती दिली आहे. गोदावरीतीरी पैठण जवळ असणा–या गंगाखेड गावातील दमा नावाच्या एका शुद्र भागवत भक्ताची ही मुलगी. दमा हा पंढरीच्या पांडुरंगाचा परम भक्त होता. करुंड ही जनाबाईची आई मोठी पतिव्रता होती. पुत्रप्राप्ती नाही म्हणून दोघेही मनापासून दुःखी होते. एकदा दोघेही पंढरीस गेले असतांना त्यांनी आत्म्हांस पुत्र व्हावा अशी पांडुरंगास प्रार्थना केली. त्याच रात्री दमास एक दृष्टांत झाला. 'तुला एक मुलगी होईल ती तुझ्या कुळाचा उध्दार करील. ' ;ही कन्या कृतयुगात पद्मिनी,त्रेतायुगात मंथरी, द्वापारयुगात कुब्जा द्व तिचे नांव जनाई ठेव व तिला दामाशेठच्या घरी पाठव. पंढरीच्या पांडुरंगाच्या विनंतीनुसार दमाने सात वर्षाची जना दामाशेठ शिंपीच्या स्वाधीन केली. जनाबाई वयाच्या दहाव्या वर्षी आईवडीलांच्या सोबत पंढरपुरला आली आणि विठ्ठलाचे दर्शन घेतले तेंव्हा आपणांस दररोज विठ्ठलाचे दर्शन व्हावे असा तिने बालहट्ट केला. योगायोगाने पंढरपुरात पांडुरंगाच्या दर्शनासाठी आलेल्या दामाशेठ शिंपीच्या ताब्यात जनाईला दिले आणि दमा व करुंड पतिपत्नी गंगाखेडला निघून गेली. असाही उल्लेख तिच्यचा जन्मकालविषयी आढळतो. जनाबाई पाच–सात वर्षाची असतांना पांडुरंगाच्या आदेशाप्रमाणे दामाशेठ शिंपीच्या घरी राहू लागली. तेंव्हा तिला नामदेवाच्या भक्तीमय व्यक्तिमत्वाचा सहवास लाभला त्याचा परिणाम म्हणून तिच्या अंतःकरणात पांडुरंगाविषयी आवड निर्माण झाली. पांडुरंगाला शरण जावून मनापासून भक्ती करु लागली. जनाबाई म्हणजे एक शुद्र स्त्री आणि नामयाची दासी म्हणून दामाशेठच्या घरी झाडलोट करणे, धुणीभांडी करणे, दळणकांडण करणे इ. कामात जनाबाईचे सर्व आयुष्य गेले. परंतु नामदेवांच्या सहवासामध्ये विठ्ठल भक्तीचा आनंद मिळाला म्हणून ती स्वतःचा उल्लेख नामयाची जनी असा करते. नामदेवा बद्दल तिच्या मनात अपार श्रध्दा होती. नामदेवामुळेच आपल्या जीवनाचे सार्थक झाले. त्यामुळे जनाबाईच्या लौकि आध्यात्मिक जीवनात नामदेवाचे स्थान अनन्य साधार आहे.

***जनाबाईची अभंगवाणी :***

जनाबाईच्या अभंगवाणीची रचना स्वतंत्र नसली तरी ती अतिशय उच्च दर्जाची आहे. संत नामदेवांच्या अभंगवाणीच्या गाथेत तिच्या तीनशे पन्नास इतक्या अभंगाची नोंद आहे. तिच्या नावावर मुख्यतः विठ्ठल महिता, संतचरित्रे, आरत्या, पदे इ. रचना आढळते. त्याप्रमाणे हरिश्चंद्र आख्यान, कृष्णजन्म, बालक्रीडा, दशावतरावर्णन, थालीपाक अशी काही आख्यानकाव्ये आहेत. या आख्यानकावयातून श्रीकृष्ण, विश्वामित्र, हरिश्चंद्र, दुर्योधन, दुर्वासऋषी, पांडव, द्रोपदी, रोहिदास इ. भक्तांचे आदर्श स्पष्ट केले आहेत. थालीपाक, तीर्थावळी, पाळणा, दशावतारवर्णन इ. स्फूट रचनेतून पौराणिक संदर्भ आढळतात. यामधून जनाबाईच्या स्त्री मनाचा हळुवारपणा, भक्तीची उत्कंठा, परमेश्वर प्राप्तीची तळमळ इ. गोश्टींचे दर्शन घडते. विशेषतः आपल्या जीवनात जे प्रसंग आले, जो अनुभव आला ते सर्व जनाबाईने प्रांजळपणे आपल्या अभंगवाणीतून मांडले. त्यामुळे जनाबाईची अभंगवाणी म्हणजे करुणा आणि आर्ततेचा कळसच आहे.

वारकरी संप्रदायातील इतर संताप्रमाणेच तिने नामसंकीर्तनाला विशेष महत्व दिले. आपलया आयुष्याचे सार्थक व्हावे असे वाअत असेल तर नामसंकीर्तनाशिवाय दुसरा पर्याय नाही. असे जनाबाईना वाअते. त्याविषयी जनाबाई म्हणते की,

नामदळणी कांडणी । म्हणे नामयाची जनी ।।
नाम गात्र वेळावेळी । दासी जनीसी नित्य चाळा ।।
गाता विठोबाची किर्ती महापतके जळती ।।

नाम हा निर्गुण निराकार असा ब्रह्माचा आणि वर विठोबाची निशाणी असलेला शिक्का आहे. त्यामुळे परमेश्वर चरणी जाण्यासाठी नामस्मरणाशिवाय दुसरा पर्याय नाही, असे जनाबाईला मनापासून वाटते. जनाबाईची पंढरीच्या पांडुरंगावर नितांत भक्ती होती. जीवनाचा भवसागर तरुन जाण्यासाठी नामभक्तीसारखा दुसरा सोपा मार्ग नाही. म्हणून नामाचे महत्व अविरत आहे. जनाबाई म्हणते की,

नाम विठोबाचे घ्यावे । मग पाऊल टाकावे ।।
नाम तारक हे थोर । नामे तारिले अपार ।।
नाम फुकट चोखट । नाम घेता न ये वीट ।।
जळ शिळा ज्या सागरी । आत्मा रामे नामे तारी ।।

असा दृढ विश्वास जनाबाईंनी व्यक्त केला आहे. कारण आपल्या सारख्या एका पोरक्या दासीला म्हणजेच एका अनाथ, शुद्र दासीवर देवाने इतकी कृपा करावी याचे तिला मोठे नवल वाटते. ईश्वर प्राप्तीसाठी कोणतीही जात, धर्म, पंथ इ. चे बंधन नसते. ब्राह्मण, पांडित्य, उच्च सामाजिक पदवी, संपत्ती या गोष्टींची सुध्दा गरज नसते. फक्त आपली साधी, सरळ, निर्मळ, निर्वाज्य, उत्कट भक्ती असावी लागते. म्हणजे परमेश्वराजवळ जाता येते.

जनाबाईची विठ्ठलावर मनापासून श्रध्दा होती. विठ्ठल हे तिचे आराध्य दैवत होते. विठ्ठल दर्शनाने, नामस्मरणाने तिच्या पोरक्या जीवनात नवचैतन्य फुलले. मात्र तिच्या एकाकी जीवनाची तीव्रता कमी झाली नाही. विठ्ठलमय झालेली जनाबाई दुःखी मनाने तुजवीण देवराया । कोणी नाही हे सखया ।। अशी देवाला साद घालते. तर कधी विठ्ठलाच्या भेटीसाठी धावा करते. अरे पंढरीच्या पांडुरंगा माझ्या आंधळयाची काठी कोठेतरी हरवली आहे. हे मी कोणाला सांगावे ?अशी भावना व्यक्त करुन पांडुरंगाला विनवणी करते की,

माय मेली बाप मेला । आता सांभाळी विठ्ठला ।।
मी तुझे गा लेकरू । नको मनासी अव्हेरू ।।
स्त्री जन्मा म्हणवूनी न व्हावे उदास ।।
साधुसंता ऐसे केले जनी । संतांचे घरची दासी मी अंकिली ।।

या अभंगवाणीतून तिच्या जीवनाचे संदर्भ प्रकट होतात.

जनाबाईला आपल्या जीवनात सामाजिक, आर्थिक, प्रतिष्ठा मिळाली नाही. आपण शुद्र, पापी, अज्ञानी, अनाथ आहोत त्यामुळे देवाने आपला उध्दार करावा म्हणून ती मनापासून देवाचा धावा करते.

येग येग विठाबाई । माझे पंढरीचे आई ।।
भीमा आणि चंद्रभागा । तुझ्या चरणीच्या गंगा ।।
इतुक्या सहित तू बा यावे । माझे अंगणी नाचावे ।।
माझिये जननी हरिणी । गुतलीस कवणे वनी ।।
मुळे मी तुझे पाडस । .................. फिरतसे रानोरान ।।

या अभंगातून जनाबाईच्या अंतःकरणातील विठ्ठलाच्या भेटीविषयी तळमळ, प्रबळ इच्छा, असाधारण आर्तता आणि कमालीची अधिरता प्रकट होते. जनाबाई जीवाच्या आकांताने पंढरीच्या पांडुरंगाचा धावा करते. त्याची करुणा भाकते. तरी देव भेटत नाही. म्हणून ती देवाला शिव्या देण्यास घाबरत नाही.

अरे अरे विठया । मुळ मायेच्या कारटया ।।
तुझी रांड रंडकी झाली । जन्म सावित्री चुडा ल्याली ।।
तुझे गेले मढे । तुला पाहुनी काळ रडे ।।
उभे राहुनी अंगणी । शिव्या देते दासी जनी ।।
निघाले केशवा तुझे घर ।।

पंढरीच्या विठ्ठल दर्शनासाठी आतुर झालेल्या जनाबाईने सुसंस्कृतपणाचे, शिष्टाचाराचे सामाजिक संकेत झुगारुन दिले आणि अरे देवा, पंढरीच्या बाजारात जिने आपले पाल मांडले आहे. जी निर्लज्जपणाने केशवाच्या दारी जाण्यासाठी निघालेली आहे. अशी एक वेश्या आहे. अशा प्रकारे ती आपला देवावरील राग व्यक्त करते.

जनाबाईनी आपल्या अभंगवाणीतून संतांची भक्तीभावाने स्त्री सुलभ अशा प्रेमळ धाग्यातून सुंदर संतचरित्रे गुंफली आहेत. उदा. ज्ञानेश्वर, नामदेव, चोखामेळा, सेना न्हावी इ. जनाबाई म्हणते की,

विठो माझा लेकुरवाळा । संगे लेकुरांचा मेळा ।।
निवृत्ती हा खांद्यावरी । सोपानाचा हात धरी ।।
पुढे चाले ज्ञानेश्वर । मागे मुक्ताई सुंदर ।।
गोरा कुंभार मांडीवरी । चोखा जीवा बरोबरी ।।
बंका कडियावरी । नामा करांगुळी धरी ।।
जनी म्हणे रे गोपाळा । करी भगवंताचा सोहळा ।।

ज्ञानेश्वरांनी आपल्याला आधार द्यावा. अशी तिची मनापासून इच्छा होती. ज्ञानाचा सागर। सखा माझा ज्ञानेश्वर ।। मरोनिया जावे । बा माझ्या पोटा यावे ।। अशा भावपूर्ण शब्दात ज्ञानेश्वरांशी संबंध जोडताना दिसते. महाविष्णूचा अवतार । सखा माझा ज्ञानेश्वर ।। असे ज्ञानेश्वरांना देवत्व बहाल करणारी जनाबाई मुलखावेगळी संत कवयित्री आहे. या संदर्भात ल. रा. नसिराबादकर म्हणतात की, ' जनाबाई या मूळताच जातिवंत कवयित्री आहे.'[1]

संत नामदेवांची दासी असूनही आपल्या भक्तीच्या जोरावर जनाबाई ही संत मेळयातील संतांमध्ये श्रेष्ठ भक्त झाली. तिच्या भावभक्तीत इतकी शक्ती आहे की, तिने प्रत्यक्ष पांडुरंगाला मनुष्य पातळीवर आणण्याचा अट्टहास केला. इतकेच नव्हे तर आपली सर्व कामे देवच करतो. याचे तिला मोठे आश्चर्य वाटते. याचा प्रत्यय खालील अभंगवाणीतून येतो.

झाड लोट करी जनी । केरभरी चक्रपणी ।।
पाटी घेवूनि डोईवरी । नेवुनिया आकी दुरे ।।
राना गेली शेणासाठी । वेचू लागे विठोपाठी ।।
जनी जाय पाणीयासी । मागे धावे ऋषीकेशी ।।

नामदेव हे आपले गुरू आणि संत आहेत. म्हणून जनाबाईला ते अधिक जवळचे वाटतात. नामदेवांचा महिमा स्पष्ट करणारे काही अभंग जनाबाईंनी लिहिले. त्याबरोबर कीर्तन सोहल्याचे वर्णन केले. नामदेवांविषयी म्हणते की,

मागे किती संत झाले । नाम्या ऐसे कोण बोले ।।
नामा जाता राऊळाशी । देव बोले आधी त्यासी ।।

नामदेवांच्या चरित्रातील काही अद्भूत प्रसंग सांगितले आहेत. उदा. भीमा नदीला पुर येणे, जोराचे वारे सुटणे, पाऊस पडणे, आषाढी एकादशी–नामा उपाशी इ. प्रसंगाप्रमाणे जनाबाईनी आपल्या जीवनातील पदक चोरीचा प्रसंग सुध्दा सांगितला आहे. हा तिच्या मनाचा मोठेपणा आहे.

जनाबाईच्या अभंगवाणीचा विचार केला तर तिच्या अभंगवाणीतून विठ्ठल भक्तीची ओढ, व्यथा, वेदना, मानसिक ताण–तणाव, एकाकीपणाची, पोरकेपणाची जाणीव, स्त्री जन्माचे दृःख आणि संत सज्जनांबद्दल आदरभाव इ. गोष्टींचे दर्शन घडते. या संदर्भात ह.श्री. शेणोलीकर म्हणतात की, ' अकृत्रिमभावना व सरळ आविष्कार या दोन विशेशांनी जनाबाईची अभंग रचना परिणामाकरक झाली आहे. '[2]

जनाबाई कबीर आणि रोहिदास या हिंदी संतकवींचा उल्लेख करताना म्हणते की, कबीराच्या बैसोनी पाठी । शेला विणीता सांगे गोश्टी ।। रोहिदास तो चांभार । त्याचा करी कारभार ।। म्हणजेच तिच्या अभंगवाणीत हिंदी मराठी संत कवितेच्या परंपरेचा संगम झालेला दिसून येतो. त्याप्रमाणेच जात्यावरील ओव्यांमधून लोकगीतांचा आविष्कार झाल्याचा प्रयत्य येतो. उदा.

सुंदर माझे जातें ग फिरे बहुतेकें । ओव्यां गाऊ कौतुके तूं येरे बां विठ्ठला ।
जीव–शिव दोनी खुंटे गे प्रपंचाचे नेटेंगे । लावूनि पांची बोट गें तू येरे बा विठ्ठला ।
सासू आणि सासरा दीर तो तिसरा । ओव्यां गाऊ भ्रतारां तू ये रे बां विठ्ठला ।
प्रपंच दळण दळिले पीठ भरिले । सासूपुढे ठेविलें तू ये रे बां विठ्ठला ।

जनाबाईनी इतर संतांप्रमाणेच विठ्ठलाला मातृ रुपे बहाल केली आहेत. देव आणि भक्त यांच्यातील नातेसंबंध कल्पून विश्वाचा संसार सांभाळणा–या देवाचा आधार आपल्याला आहे असा दिलासा ती व्यक्त करते.

पक्षी जाय दिगंतरा । बाळकासी आणी चारा ।
घार हिंडते आकाशी । झांप घाली पिलांपाशी ।
मता गुंतली कामाशी । चित्त तिचे बाळापाशी ।
वानर हिंडे झाडावरी । पिल्लां बांधूनि उदरी ।
तैसी आम्हांसी विठ्ठल मायें । जनी वेळोवेळी पाहें ।

जनाबाईची अभंगवाणीची भाषा अत्यंत साधी सरळ, प्रांजळ, प्रामाणिक, प्रासादिक आणि अलंकृत आहे. अभंगवाणीतील सुभाषीत रचना अत्यंत आकार्शक दर्जाची आहे. उदा. ज्याचा सखा हरी । त्यावरी विश्व कृपा करी ।। सुखे संसार करावा । माझी विठ्ठल आठवावा ।। जनाबाईसारख्या एका निरक्षर, साध्या, सरळ स्वभावाच्या स्त्री मनाचे सत्य प्रतिबिंब उमटले आहे.

संत जनाबाईला नामदेवांचा सहवास लाभल्यामुळे त्यांच्या वाणीची छाप तिच्या काव्यावर पडली. त्यांच्या वाणीतील गोडवा केवळ विठ्ठल प्रेमामुळे अधिक उत्कट झाला. त्यामुळे तिचे अभंग अत्यंत भावमधूर झाले हा एक योगायोग असावा. याविशयी ल.रा. पांगारकर म्हणतात की, 'जनाबाईच्या अभंगात ज्ञानदेवांची सगुणप्राती व योगानुभुती असा दोहांचाही प्रत्यय येतो. '[3]

### *तत्वतः*

जनाबाईची अभंगवाणी ही नामदेवांच्या अभंगवाणीप्रमाणेच एक छोटीशी संतसकल गाथाच आहे. तिच्या अभंगवाणीची रचना ही एका कष्टकरी, कामकरी, संत कवयित्रीची सुरेख कविता आहे. ती एका अनाथ, एकाकी, उपेक्षित, स्त्रीमनाची कविता आहे. तिच्या जीवनातील अनुभव अद्भुत आहेत. ही तिच्या अभंगवाणीची खास वैशिष्टये आहेत. म्हणजेच नामदेवाच्या रूपाने भक्तीचा, ज्ञानाचा, प्रकाशाचा नंदादीप जनाबाईच्या जीवनात प्रज्वलित झाला. हे मात्र तितकेच खरे ! जर जनाबाईच्या अभंगवाणीवर संशोधन झाले तर जनाबाईंच्या कवित्वरुपी अभंगवाणीचा अधिक परिचय होईल. असे मनापासून वाटते.

( जनाबाई – समाधी काळ– आषाढ वद्य शके 1275 (इ.स. 1350 )

### *संदर्भ :–*


| | | |
|---|---|---|
| 1.ल.रा. नसिराबादकर | : | प्राचीन मराठी वाड्.मयाचा इतिहास |
| : | | आवृत्ती आठवी, जुलै–2001,पृष्ठ–94 |
| 2.ह.श्री. शेणोलीकर | : | प्राचीन मराठी वाड्.मयाचा इतिहास |
| : | | आवृत्ती सहावी, 1987,पृष्ठ–60 |

| | | |
|---|---|---|
| 3.ल.रा. पांगारकर | : | प्राचीन मराठी वाड्.मयाचा इतिहास |
| : | | आवृत्ती दुसरी, पृष्ठ– 446 |
| 4.अ.ना. देशपांडे | : | प्राचीन मराठी वाड्.मयाचा इतिहास |
| : | | भाग–दोन |
| 5.हेमंत इनामदार, ल.रा.नसिराबादकर | : | महाद्वाराच्या पायरीशी आवृत्ती दुसरी – 1984 |
| 6.आरती दातार | : | महाराष्ट्रातील संत कवयित्री |
| : | | प्रथमावृत्ती – 3 सप्टेंबर 2009 |
| 7.प्रकाश देशपांडे केजकर | : | संत कविता एक दृश्टिकोन |
| : | | प्रथमावृत्ती – 2006 |
| 8.शैला गावंडे | : | 10 संत कवयित्री |
| : | | आवृत्ती दुसरी– 10 जुलै 2011 |
| 9.श्रामचंद्र देखणे | : | वारी : स्वरुप आणि परंपरा |
| : | | आवृत्ती दुसरी – 2008 |